**Coverage of launch of Pilot SMART Centre with Dr Nanasaheb Parulekar Sakal Charitable Trust's APL Learning in Pune**



टेक महिंद्रा फाउंडेशन आणि 'एपीजी लर्निंग' चा उपक्रम

# गरजू युवकांसाठी मोफत कौशल्यविकास प्रशिक्षण

मयूर कॉलनी, ता. १ : टेक महिंद्रा फाउंडेशन आणि एपीजी लर्निंग पावर्ड बाय 'सकाळ' यांच्यावतीने सुंदराबाई राऊत हॉस्पिटल केळेवाडी, कोथरूड येथे ३० जूनपासून गरजू युवकांसाठी मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन टेक महिंद्रा फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अध्यक्ष चेतन कपूर, पुणे विभाग प्रमुख कल्पना दिवाडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी व्यवसाय प्रमुख अंकित माहेश्वरी, सीईओ एपीजी लर्निंग निनाद पानसे, प्रशिक्षण केंद्राचे पूजा गुरव, मंचक हुडे, अपूर्वा देशपांडे, अपूर्वा शिंदे उपस्थित होते. कपूर यांनी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला. ते म्हणाले, "एकत्र काम केल्यामुळे प्रगती होते. तळागाळापर्यंत काम केल्यास नेमके प्रश्न समजतात. प्रशिक्षण घेणाऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत, परंतु कष्ट हे तुम्हालाच घ्यावे लागणार आहेत. आजपर्यंत ९० रोजगार प्रशिक्षण केंद्रे उभी करून, एक लाख ३२ हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले आहे. केवळ प्रशिक्षित केले नाही तर त्यांना नोकरी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत." यावेळी प्रशिक्षणार्थींसह शिक्षक, आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> प्रशिक्षणामधून टॅली, जीएसटी व्यवस्थितरीत्या समजावून सांगण्यात आले. खूप चांगल्या पद्धतीने प्रशिक्षण मिळाले. आमच्या ज्ञानात भर पडली. व्यक्तिमत्त्व विकास, संभाषण कौशल्य आत्मसात करता आले. प्रशिक्षणामुळे आम्ही वेगळी ओळख निर्माण करू शकलो.
> – पल्लवी हेमाडे, प्रशिक्षणार्थी

> 'सकाळ' आणि टेक महिंद्रा फाउंडेशन यांच्यामार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण मिळाले. आपले ध्येय कसे पूर्ण करायचे हे या प्रशिक्षणातून समजले. संगणक प्रशिक्षण, संभाषण कौशल्य, आत्मविश्वास या ठिकाणी मिळाला. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मला चांगल्या कंपनीमध्ये चांगल्या पगाराची नोकरी मिळवून देण्यात प्रशिक्षकांचा मोठा वाटा आहे.
> – वैशाली बोरोळे, प्रशिक्षणार्थी

कोथरूड : टेक महिंद्रा फाउंडेशन आणि एपीजी लर्निंग यांच्यावतीने युवकांसाठी मोफत कौशल्यविकास प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन झाले. या वेळी चेतन कपूर, कल्पना दिवाडकर यांच्यासह अन्य कर्मचारी.

**<u>Sakal (Published on 02 July 2022)</u>**